# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः03.09.2024** **वारःमंगळवार**

1.सहकारी संस्थांनी तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन

2.शेतकऱ्यांचं जीवनमान सुधारण्याच्या उद्देशानं सुमारे १४ हजार कोटी रुपयांच्या ७ योजनांना केंद्रीय मंत्रीमंडळाची मान्यता; मनमाड-धुळे-इंदूर रेल्वेमार्गालाही मंजुरी

3.क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार जाहीर

4.पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंकडून पदकांची लयलूट

आणि

5.विदर्भ आणि मराठवाड्यात पावनं झोडपलं

**<u>राष्ट्रपति-राज्यदौरा</u>**

सहकारी संस्थांनी तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल केलं. कोल्हापूरच्या वारणानगर इथं वारणा महिला सहकारी उद्योग समूहाच्या सुवर्णमहोत्सवी समारंभात त्या बोलत होत्या. वारणा विद्यापीठाचं उद्घाटनही यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

सहकार क्षेत्रातील संस्थांनी व्यवस्थापनात अचूकता आणावी, अधिकाधिक युवांना या क्षेत्राशी जोडून घ्यावं, असं त्यांनी सुचवलं. सहकारात खरं सहकार्य हवं, व्यक्तीहित नको असं राष्ट्रपती म्हणाल्या. तात्यासाहेब कोरे यांनी मुहूर्तमेढ रोवलेल्या वारणा महिला सहकारी उद्योग समूहाने, सहकारातून, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात, पर्यायाने देशातील विकासात मोठं योगदान दिलं आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रपतींनी यावेळी काढले. महिलांच्या योगदानाविषयी बोलताना त्या म्हणाल्या..

विकासात जोवर महिलांची भागिदारी वाढणार नाही तोवर विकास होणार नाही या तात्यासाहेब कोरे यांच्या दृष्टिकोणाची कास धरत राज्य सरकार महिलांसाठी विविध योजना राबवत असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रसंगी बोलताना सांगितलं.

तत्पूर्वी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांचं काल कोल्हापूर विमानतळावर स्वागत केलं. त्यानंतर राष्ट्रपतींनी करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी देवीची विधिवत पूजा केली. राष्ट्रपती कालपासून तीन दिवसांच्या राज्याच्या दौऱ्यावर असून आज त्या पुण्यातील सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या 21व्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. तसंच मुंबईत विधान परिषदेच्या शताब्दी वर्षाच्या कार्यक्रमातही सहभागी होणार आहेत. उद्या राष्ट्रपतींच्या हस्ते लातूर जिल्ह्यातील उदगीर इथल्या बुद्ध विहाराचं उद्घाटन होणार आहे.

**<u>केंद्रीय मंत्री मंडळ निर्णय</u>**

शेतकऱ्यांचं जीवनमान सुधारण्यासाठी आणि त्यांचं उत्पन्न वाढावं या हेतूने 13 हजार 9शे66 कोटी रुपये खर्चाच्या 7 महत्त्वपूर्ण योजनांना केंद्रीय मंत्रीमंडळानं काल मंजूरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमध्यमांशी बोलताना याबाबत माहिती दिली. डिजिटल कृषी अभियान, अन्न आणि पोषण सुरक्षेची योजना

त्याबरोबरच कृषि शिक्षण आणि व्यवस्थापन मजबूत करण्यासाठी 2हजार 2शे 91 कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णयही घेण्यात आला. पशुधनाचं आरोग्य सुधारण्यासाठी तसंच फलोत्पादनाच्या शाश्वत विकासासाठीच्या योजनांनाही काल मान्यता देण्यात आली.

तीन रेल्वे प्रकल्पांनाही या बैठकीत मंजूरी देण्यात आली. यात राज्यातील मुंबई ते इंदूर दरम्यानच्या मनमाड-धुळे-इंदूर रेल्वेमार्गाचा समावेश आहे. ३०९ किलोमीटर लांबीच्या या रेल्वेमार्गासाठी १८ हजार ३६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. येत्या ५ वर्षात हा प्रकल्प पूर्ण होईल, असं वैष्णव यांनी सांगितलं.

**शिक्षक पुरस्कार**

शासनाच्या वतीने काल २०२३-२४ साठीच्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. एकंदर १ शे ९ शिक्षकांना हे पुरस्कार जाहीर करण्यात आले असून, यात, प्राथमिक विभाग, माध्यमिक विभाग, आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे प्राथमिक शिक्षक, समाज सुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, विशेष कला क्रीडा शिक्षक, दिव्यांग शिक्षक आणि स्काऊट गाईड शिक्षकांचा समावेश आहे. येत्या ५ सप्टेंबर रोजी मुंबईत आयोजित होणाऱ्या कार्यक्रमात या शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**मेट्रो-मोहोळ**

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यातील पीसीएमसी ते स्वारगेट या मेट्रोमार्गावरील जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या, शेवटच्या टप्प्यातील मार्गाच्या कामांचा आढावा घेतला. यावेळी बोलताना ते म्हणाले..

जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या सहा किलोमीटर लांबीच्या मार्गावरील कसबा पेठ, मंडई आणि स्वारगेट या स्थानकांचं काम पूर्ण झालं आहे. काही स्थानकांची नावं बदलण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून याबाबतचे गॅझेटही लवकरच प्रसिद्ध होईल, असं मोहोळ पुढे म्हणाले. केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिलेल्या स्वारगेट ते कात्रज या भुयारी मार्गाचं भूमिपूजनही याचवेळी होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**सरदार मुजुमदार गणेशोत्सव**

पुण्यातील पेशवेकालीन सरदार मुजुमदार गणेशोत्सव दरवर्षी भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला सुरू होतो. या वैशिष्ट्यपूर्ण उत्सवाविषयी अधिक माहिती देत आहेत सरदार आबासाहेब मुजुमदार यांच्या नातसून अनुपमा मुजुमदार.

**बैलपोळा**

बळीराजाच्या बरोबरीनं शेतात राबणाऱ्या सर्जा राजा बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी काल राज्यात, विशेषतः ग्रामीण भागात बैलपोळ्याचा सण पारंपरिक पद्धतीने आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या जन्मगावी, परळी तालुक्यातील नाथरा इथे, काल पारंपरिक पद्धतीने बैलपोळा साजरा केला.

विदर्भातील भंडारा जिल्ह्यात, बैल पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी महणजे आज लाकडी बैलांचा, तान्हा पोळा साजरा करण्यात येणार आहे.

वाशिम जिल्ह्यातल्या, मालेगाव तालुक्यातील ढोरखेड इथे महिलांच्या हाती बैलाचा कासरा देऊन महिलांना मान देत बैल पोळा साजरा करण्यात आला.

**हत्या**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची रविवारी, पुण्यातील नाना पेठेत गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. पोलिसांनी याप्रकरणी १० ते १२ आरोपींची ओळख पटवली असून काही जणांना अटक केली आहे.

**पॅरालिम्पिक**

पॅरिसमध्ये सुरू असलेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेचा कालचा पाचवा दिवस भारतासाठी आनंददायक ठरला ठरला. दोन सुवर्ण आणि दोन रौप्य पदकांसह पदक तालिकेत भारत १५ व्या क्रमांकावर पोहोचला. सुमीत अंटीलनं भालाफेकीत मिळवलेलं सुवर्णपदक हे कालच्या दिवसाचं खास वैशिष्ट्य ठरलं. बॅडमिंटनमध्ये पुरूष एकेरीच्या SL3 मध्ये नितेश कुमारनं सुवर्णपदक जिंकलं. तर सुहाज यतिराज यानं SL4 इव्हेंटमध्ये रौप्य पदकाची कमाई केली. बॅडमिंटनच्या महिला एकेरीत तुलसीमती मुरुगेसन हिनंही रौप्यपदक मिळवलं. याशिवाय बॅडमिंटनमध्ये तसंच तिरंदाजीत मिश्र सांघिक प्रकारात कास्यपदकं मिळाली. तत्पूर्वी थाळीफेकीत योगेश कथुनियानं रौप्यपदक मिळवलं

**पाऊस**

विदर्भ आणि मारठवड्याला अतिवृष्टीचा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी नदी-नाल्यांना पूर आला आहे. अतिवृष्टीत ४ लोकांना प्राण गमवावे लागले असून, १७ जण जखमी झाले आहेत. ८८ जनावरं या अतिवृष्टीत दगावली आहेत. अनेक ठिकाणी शेतीच तसंच घरांचं मोठं नुकसान झालं आहे.

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील चार गावातून, पुराच्या पाण्यात अडकलेल्या 39 जणांची राष्ट्रीय आपत्ति निवारण दलाच्या जवानांनी सुटका केली.

परभणी जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे २३ गावांचा संपर्क तुटला आहे.

नांदेड येथील विष्णुपुरी प्रकल्पाचे १४ दरवाजे उघडण्यात आले आहेत. त्यामुळे नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

सोलापूर आणि वाशिम जिल्ह्यातही जोरदार पाऊस झालं.

**हवामान**

राज्यात विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागान दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.